अनेकान्त एज्यूकेशन संस्थेचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

### इतिहास विभाग

दि. 08 / 03 / 2023

प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

बारामती

विषय : अभ्यास सहलीस परवानगी मिळणेबाबत....

महोदय,

इतिहास विभागातर्फे पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी लोणी भापकर येथे अभ्यास सहलीचे आयोजन करण्याचा विचार आहे. या अभ्यास सहलीत लोणी भापकर येथील ऐतिहासीक मंदीरे व वीरगळ यांना भेट देण्यात येईल. ही अभ्यास सहल शुक्रवार, दि. 10 / 03 / 2023 रोजी सकाळी 9:00 ते दुपारी 1:00 या वेळेत पार पाडण्यात येईल. साधारणपणे 20 विद्यार्थी या अभ्यास सहलीत सहभागी होतील अशी अपेक्षा आहे. तरी सदर अभ्यास सहलीचे आयोजन करण्यास परवानगी मिळावी, ही नम्र विनंती.

Allowed 9/03/2023

समन्वयक

विभाग प्रमुख

Allowed 8/3/23

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

अनेकान्त एज्युकेशन संस्थेचे

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## इतिहास विभाग – सेंटर फॉर ओरिएंटल स्टडीज

## अभ्यास सहल अहवाल

दि. ११/०३/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

बारामती.

महोदय,

इतिहास विभागाच्या सेंटर फॉर ओरिएंटल स्टडीज या उपक्रमाअंतर्गत शुक्रवार दि. १०/०३/२०२३ रोजी लोणी भापकर, ता. बारामती, जि. पुणे येथे एक दिवसीय अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर अभ्यास सहलीत एफ. वाय. बी. ए., एस. वाय. बी. ए. व टी. वाय. बी. ए. या वर्गातील तेवीस विद्यार्थी सहभागी झाले होते. ज्या विद्यार्थ्यांची वर्गातील नियमित उपस्थिती ७५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे अशाच विद्यार्थ्यांना या अभ्यास सहलीत सहभागी करून घेण्यात आले.

या अभ्यास सहलीत विद्यार्थ्यांनी लोणी भापकर येथिल पेशवेकालीन काळभैरवाचे व दशभूजा दत्त मंदीर, यादवकालीन हेमाडपंथी मल्लिकार्जून मंदीर, सरदार सोनजी भापकरांच्या गढीचे अवशेष, अनेक वीरगळ इ. ठीकाणांना भेट दिली व त्यांचे ऐतिहासिक महत्व जाणून घेतले. या अभ्यास सहलीच्या वेळी मल्लिकार्जुन मंदीराच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य व त्या मंदीराच्या दुरूस्तीचे काम व्हावे यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न करणारे श्री. गोलांडे बी. एन. यांनी मल्लिकार्जुन मंदीराची माहीती देउन मोठे सहकार्य केले. या संपूर्ण प्रक्रीयेत अनेक वेळा सहभागी विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून या ऐतिहासिक अवशेषांबाबत अधिक जाणून घेतले. ऐतिहासिक वास्तूंना डोळसपणे भेट देता आल्याने व ऐतिहासिक वस्तू प्रत्यक्ष हाताळता आल्याने सहभागी विद्यार्थी उल्हसित झाले व त्यांच्यात इतिहासाबाबत कुतूहल निर्माण झाले.

या अभ्यास सहलीत शिक्षकांमधून डॉ. संदीप संभाजी तारदाळकर व प्रा. डी. टी. मोहिते हे सहभागी झाले होते. तसेच अभ्यास सहलीच्या आयोजनात आपल्या संस्थेचे मा. अध्यक्ष, मा. सचिव, महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, सर्व मा. उपप्राचार्य, रजिष्ट्रार यांनी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Noted IQAC

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: SL 335
Date: 14 MAR 2023

विभाग प्रमुख







TULJARAM CHATURCHAND COLLEGE ★ BARAMATI




TULJARAM CHATURCHAND COLLEGE
BARAMATI